Literacy for a Billion

Movie: Sasurwashin
Year: 1978

Song: Mala Baghun Tumhi
Lyricist: Shanta Shelke, Chintamani Potdar

मला बघून तुम्ही डोळं मोडू नका
हो मला बघून तुम्ही डोळं मोडू नका
भलत्या फंदात भरीला पाडू नका
भलत्या फंदात भरीला पाडू नका
माझ्या पदराचं टोक तुम्ही ओढू नका
माझ्या पदराचं टोक तुम्ही ओढू नका

निळया नभामधी जशी चवथीची कोर
तशी कुळाच्या माझ्या मी नवतीची पोर
जवळ येऊन तुम्ही असं छेडू नका
हो जवळ येऊन तुम्ही असं छेडू नका
कळी आली फुलून तिला तोडू नका
हो माझ्या पदराचं टोक तुम्ही ओढू नका
माझ्या पदराचं टोक तुम्ही ओढू नका
जरा जवळ ये नीट समजून घे
काय सांगायचं हाय ते लांबून सांग
रंग गोरा माझा जसं केवड्याचं पान

चारचौघी मध्ये मला रूपाचा मान
वय लहान अजून नातं जोडू नका
वय लहान अजून नातं जोडू नका
बावरी हरिण मी तीर सोडू नका
हो माझ्या पदराचं टोक तुम्ही ओढू नका
माझ्या पदराचं टोक तुम्ही ओढू नका
जरा जवळ ये नीट समजून घे
काय सांगायचं हाय ते लांबून सांग

माझ्या ज्वानीची हो लई भीती मनात
माझी बांगडी पेटंल माझा सोडा हो हात
वाट अडवून अशी खोड काढू नका
वाट अडवून अशी खोड काढू नका
माझ्या लाजंचा बुरखा काढू नका
हो माझ्या पदराचं टोक तुम्ही ओढू नका
माझ्या पदराचं टोक तुम्ही ओढू नका

Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.

PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.